**नियमित फौजदारी केस नं. ८४/२०२३**
**नि. क्र. २२**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – निलेश जगन्नाथ जाधव,

**वय**– ३६ वर्षे, **व्यवसाय** – खाजगी व्यवसाय,

**राहणार** – साखरपा, जाधववाडी, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून –**

**०१**. मी साखरपा, जाधववाडी येथे राहतो. आमच्या वाडीत रत्नागिरी–कोल्हापुर महामार्गालगत सती माता मंदीर आहे. त्या मंदीराची देखभाल आमच्या वाडीतील पाच मानकरी करतात. त्यापैकी मी एक मानकरी आहे.

**०२**. दिनांक १७/०७/२०२३ रोजी मी माझ्या घरी असताना संध्याकाळी ०७:०० वाजताच्या सुमारास आमच्या त्या मंदीराचे एक मानकरी कुमार काशीराम जाधव हे माझ्या घरी आले. त्यांनी मला सांगितले की, ते त्यादिवशी संध्याकाळी ०५:४५ वाजताच्या सुमारास मंदीरात दर्शणासाठी गेले होते. त्यावेळी मंदीरात एक अनोळखी जोडपे म्हणजे एक पुरुष व एक स्त्री होते. मंदीराच्या समोरील दर्शनी भागात बसविलेला एक कॅमेरा व गाभाऱ्यात बसविलेला एक कॅमेरा असे दोन कॅमेरे त्या ठिकाणाहून काढून मंदीरात ठेवण्यात आल्याचे त्यांना दिसले. त्यावर त्यांनी ते दोन्ही कॅमेरे गाभाऱ्यातील पेटीत ठेवले. दर्शण घेवुन ते घरी परत जात असताना वाटेत असतेवेळी मंदीरातील लाईट सुरु झाल्याचे त्यांना दिसले. त्यामुळे ते परत गेले. त्यावेळी एका पांढऱ्या बोलेरो पिकअपमधून ते जोडपे तेथून निघून जात होते. त्यांनी पेटीत ठेवलेले कॅमेरे पाहिले असता ते कॅमेरे तेथे नव्हते. त्यावरुन ते माझ्या घरी आले. त्यांनी मला वरीलप्रमाणे सर्व हकीगत कळविली.

**०३**. ते मला आमच्याच वाडीतील सुरेश केशवराव जाधव यांच्या घरी घेवून गेले. तेथे वाडीतील इतरांनाही त्यांनी जमा केले होते. त्यानंतर आम्ही ग्रामस्थांनी रात्री

०९:००–१०:०० वाजेपर्यंत त्या जोडप्याचा शोध घेतला परंतू ते मिळून आले नाही. त्यानंतर याबाबत दिनांक २६/०७/२०२३ रोजी साखरपा पोलीस ठाणे येथे तक्रार देण्यात आली.

**०४.** त्यानंतर दिनांक २९/०७/२०२३ रोजी पोलीसांनी कुमार जाधव यांना कळविले की, ते कॅमेरे मिळून आले आहेत.

**०५.** दिनांक २६/०७/२०२३ रोजी नंतर तक्रार दिल्यानंतर पोलीस चौकशी करण्याकरीता एखदा येवून गेले होते. पोलीसांनी मला मंदीरात २७ किंवा २८ तारखेला बोलावले होते. कॅमेराज कोठे लावण्यात आले होते हे दाखविण्यासाठी मला पोलीसांनी बोलावले होते. त्यावेळी कुमार काशीराम जाधव, अजीत मनोहर जाधव व वाडीतील इतर चार–पाच लोक होते. तेथे पोलीसांनी कॅमेरा कोणत्या स्थितीत कोठे होते याबाबत माहिती मिळवली व आमची थोडीफार माहिती घेतली. त्यावर तेथे आमची नावे लिहून घेतली. पोलीसांनी इतर काही लिहून घेतले नाही.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपींतर्फे वकील श्री. एस. एस. शेख यांच्याकडून</u> –**

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, गावातील तसेच इतर भाविकांसाठी सती माता मंदीर २४ तास सुरु असते. हे म्हणणे खरे आहे की, भावीक रात्री सुध्दा त्या मंदीरात थांबतात. हे म्हणणे खरे आहे की, मंदीरातील सीसीटीव्ही कॅमेराज मधून टिपले जाणारे दृश्य चल स्वरुपात माझ्या तसेच अजित जाधव यांच्या मोबाईलवर आम्ही पाहू शकत होतो. दिनांक १७/०७/२०२३ रोजी ते प्रक्षेपण योग्यरीत्या सुरु होते. ते कॅमेराज काढतेवेळी अथवा हलवितेवेळी आम्ही अशा प्रक्षेपण स्वरुपात पाहिलेले नाही, साक्षीदार सांगतो की, त्यादिवशी विद्युत पुरवठा खंडीत झालेला होता त्यामुळे कॅमेराज बंद होते. त्यादिवशी सोमवार होता.

**०७.** मला व अजित जाधव यांना पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, तेथे आमच्या सहया घेण्यात आल्या होत्या. मला आता दाखविण्यात आलेल्या दिनांक २८/०७/२०२३ रोजीच्या पंचनाम्यावर अनुक्रमांक ०१ ची स्वाक्षरी माझी आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या सहया पोलीस ठाण्यात घेतलेल्या आहेत. मी पोलीस ठाण्यात एकच सही केली होती.

०८. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

TARE BALIRAM DATTATRAYA

Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2025.02.11 18:00:09 +0530

**(ब. द. तारे)**

**दिनांक ११/०२/२०२५** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख**

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Devrukh |
| Date | :- | 11/02/2025 |
| evidence signed by PO. on | :- | 11/02/2025 |
| evidence uploaded on | :- | 11/02/2025 |